राज्यातील नगरपालिकांमध्ये जकात कर
वसुली दिनांक १ मे, १९९९ पासून बंद
केल्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
शासन निर्णय क्र. संकीर्ण - १०९९/९२७/प्र.क्र.८८/९९/नवि-१४ (भाग-३)
दि. : १० फेब्रुवारी, २०००.

वाचा : १) शासन पत्र क्रमांक, नगर विकास विभाग, जीईएन-१०९९/प्र. क्र.७०/९९/नवि-१४,दि.२६ मार्च, १९९९.
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांक संकीर्ण -१०९९/९२७/प्र. क्र.८८/९९/नवि-१४, दि.२६ एप्रिल, १९९९. २५ मे, १९९९, २६ जून, १९९९, २६ जुलै, १९९९, १६ ऑगस्ट, १९९९, १० सप्टेंबर, १९९९, ३० ऑक्टोबर, १९९९, २० नोव्हेंबर, १९९९
३) शासन निर्णय, नगर विकास विभाग, संकीर्ण -१०९९/२२९६/प्र. क्र. २०३/९९/नवि-१४, दि. २९ नोव्हेंबर, १९९९.

**प्रस्तावना :-**

राज्यातील नगरपालिकांमधील जकात कराची वसुली दिनांक १ मे, १९९९ पासून पूर्णपणे बंद करावी व १९९८-९९ मधील जकात कराच्या उत्पन्नाच्या आधारे राज्यांतील नगरपालिकांना ५ वर्ष नुकसान भरपाई अनुदान द्यावे व पहिल्या वर्षानंतरच्या चार वर्षात १०% वाढीव दराने हे भरपाई अनुदान द्यावे. ५ वर्षानंतर नगरपालिकांना हे अनुदान देणे बंद करावे असा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील संबंधित कलमांना यानुसार आवश्यक त्या सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार दरवर्षी याबाबत अर्थसंकल्पात ३६०४, स्थानिक संस्था व पंचायत राज्य संस्था यांना नुकसान भरपाईच्या व अभिहस्तांकित रकमा देणे, २००, इतर संकीर्ण नुकसान भरपाईच्या अभिहस्तांकित रकमा नगरपालिकेतील जकात कराची वसूली रद्द केल्यामुळे द्यावयाचे सहाय्यक अनुदान (३६०४-०५२१) यामध्ये तरतूद करून त्यातून नगरपालिकांना हे अनुदान देण्यात येईल. जकात कर वसुली बंद केल्यामुळे संबंधित नगरपालिकांना नुकसान भरपाई पोटी सन १९९८-९९ या आर्थिक वर्षातील जकात करापोटी नगरपालिकांनी गोळा केलेल्या प्रत्यक्ष कराची रक्कम आधारभूत धरून विशिष्ट कराने मासिक हप्त्यात सहाय्यक अनुदान उपरोक्त संदर्भ (२) येथील शासन निर्णयान्वये वितरित करण्यात आले आहे.

०२. नव्याने निर्माण झालेल्या नगरपरिषदा/नगरपंचायती व भविष्यात स्थापन होणाऱ्या नगरपरिषदा/नगरपंचायतींना जकात कर भरपाई अनुदान कोणत्या निकषावर द्यावे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत परिक्षण करून शासनाने अशा नव्याने स्थापित नगरपालिकांना/नगरपंचायतींना त्या नगरपरिषदा/ नगरपंचायती ज्या जिल्ह्यात आहेत त्या जिल्ह्यातील सर्व "क" वर्ग नगरपालिकांची लोकसंख्या व त्या नगरपालिकेचे सन १९९८-९९ या वित्तीय वर्षातील जकातीचे प्रत्यक्ष उत्पन्न व त्यानुसार प्रती माणसी देय असलेली जकातीची निर्धारित होणारी रक्कम विचारात घेऊन नव्याने स्थापन झालेल्या/होणाऱ्या नगरपरिषद/नगरपंचायतीच्या क्षेत्रातील सन १९९१ च्या जणगणनेनुसार लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना भरपाई अनुदान द्यावे असा निर्णय घेतला आहे. उपरोक्त संदर्भ (३) येथील दि. २९ नोव्हेंबर, १९९९ च्या शासन निर्णयान्वये या निकषाचा विचार करून नगरपालिकांना/नगरपंचायतींना एकत्रितपणे अनुदान वितरित करण्यात आले व यापुढेही अशाच पद्धतीने नगरपालिकांना हे जकात भरपाई अनुदान देण्यात येईल. यानंतरचा जकात नुकसानीच्या अनुदानाचा हप्ता देतांना आवश्यक ती वाढ अथवा रक्कम समायोजित करण्यासारखी कार्यवाही करण्यात येईल.

०३. ५ वर्षानंतर हे अनुदान नगरपालिकांना देणे बंद होणार असल्याने या कालावधीत या अनुदानाएवढे उत्पन्न अन्य मार्गाने मिळविणे नगरपरिषदांवर बंधनकारक आहे.

०४.   एखाद्या नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर केल्यानंतरही अन्य सर्व बाबींची पूर्तता होत असल्यास अशा महानगरपालिकांना त्या स्थापन झाल्याच्या दिनांकापासून ५ वर्ष पूर्वीची अनुज्ञेय अनुदाने देण्यात येतात मात्र महानगरपालिका स्थापन झाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष वा महाागरपालिका जकात लागू करेपर्यंत यापैकी अगोदर येणाऱ्या कालावधीपासून जकात नुकसान भरपाई अनुदान या महानगरपालिकांना उपलब्ध होणार नाही.

०५.   अनुदानाच्या विनियोजनांबाबत उपरोक्त सूचना तसेच वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या अन्य अनुषंगीक सूचना यांची तंतोतंत अंमलबंजावणी होईल ही पाहण्याची जबाबदारी संबंधित नगरपरिषदा/नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांची राहिल. तसेच या सर्व बाबींची अंमलबजावणी योग्य पद्धतीने होते किंवा नाही याचे पर्यवेक्षण संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी वेळोवेळी आढावा घेऊन करावयाचे आहे.

०६.   या अनुदानाच्या वितरणासाठी संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले असून त्यांच्या जिल्ह्यातील नगरपालिका/नगरपंचायतींना वितरीत करावयाच्या रक्कमा पहिल्या आठवड्यात संबंधित नगरपालिकांना भरपाई अनुदान धनादेशाद्वारे कोषागारातून वितरित करणे याबाबतची कार्यवाही करावयाची आहे. तसेच या वितरित अनुदानाचा खर्चमेळाबाबत आवश्यक कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांनी पूर्ण करून अनुषंगीक अहवाल शासनास सादर करावयाचा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(प्र. द. गावडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई